**श्रीसंतोषीमातेची आरती**

जय देवी श्री देवी संतोषी माते ।
वंदन भावें माझें तव पदकमलातें ।। धृ ।।
श्रीलक्ष्मीदेवी तूं श्रीविष्णूपत्नी ।
पावसी भक्तालागीं अति सोप्या यत्नीं ।।
जननी विश्वाची तूं जीवन चिच्छक्ती ।
शरण तुला मी आलों नुरवी आपत्ती ।। १ ।।
भृगुवारीं श्रद्धेनें उपास तव करिती ।
आंबट कोणी कांहीं अन्न न सेवीती ।।
गूळ चण्याचा साधा प्रसाद भक्षीती ।
मंगल व्हावें म्हणुनि कथा श्रवण करिती ।। २ ।।
जे कोणी नरनारी व्रत तव आचरिती ।
अनन्य भावें तुजला स्मरुनी प्रार्थीती ।।
त्याच्या हांकेला तूं धांवुनिया येअसी ।
संतति वैभव कीर्ती धनदौलत देसी ।। ३ ।।
विश्वाधारे माते प्रसन्न तूं व्हावें ।
भवभय हरुनी आम्हां सदैव रक्षावें ।।
मनींची इच्छा व्हावी परिपूर्ण सगळी ।
म्हणुनी मिलिंदमाधव आरती ओवाळी ।। ४ ।।